\\\

दिनांक २१/०५/२०२६

प्रति,
**मा.पोलीस निरीक्षक साहेब**,
पोलीस स्टेशन, पाथरी
जि. परभणी

**विषय :-** **पाथरी नगर परिषद चे विद्यमान नगराध्यक्ष श्री आसेफ खान शेरगुल खान पठाण व नगर परिषद कर्मचारी श्री अशोक वाघुंबरे, श्री सुरेश जोशी, श्रीमती मिना आगळे व श्रीमती इंगळे यांचेविरुद्ध शासकीय अभिलेखांमध्ये खोटी नोंद करणे, बनावट कागदपत्रे तयार करणे, खोट्या स्वाक्षऱ्या करणे, अधिकाराचा गैरवापर करून शासकीय कामकाजात फसवणूक करणे बाबत भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करणे बाबत.**

**महोदय,**

सविनय विनंती अशी की, खालील नमूद आरोपींनी संगनमत करून पाथरी नगर परिषदेमधील शासकीय कामकाजात बेकायदेशीर हस्तक्षेप करून खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली असून शासकीय अभिलेखांमध्ये खोटी नोंद करून न्यायालय, शासन व नागरिकांची दिशाभूल करण्याचा गंभीर प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे.

**आरोपी :-**

१. श्री आसेफ खान शेरगुल खान पठाण, नगराध्यक्ष, नगर परिषद पाथरी
२. श्री अशोक वाघुंबरे, कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद पाथरी
३. श्री सुरेश जोशी, कर निर्धारक तथा प्रशासकीय कर्मचारी, नगर परिषद पाथरी
४. श्रीमती मिना दिगंबर आगळे, कर्मचारी, नगर परिषद पाथरी
५. श्रीमती इंगळे, कर्मचारी, नगर परिषद पाथरी

**तक्रारीची हकीकत :-**

१. पाथरी नगर परिषदेमध्ये स्थायी मुख्याधिकारी यांचे पद रिक्त असताना प्रशासन अतिरिक्त मुख्याधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत दिनांक १६/०३/२०२६ रोजी अर्थसंकल्पीय विशेष सभा घेण्यात आली. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ८१(९)(२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसताना आरोपींनी बेकायदेशीररित्या सभा घेतली. तसेच सभेमध्ये कोणत्याही विषयावर चर्चा न होता व कोणताही ठराव मंजूर न करता खोटी कार्यवाही नोंदविण्यात आली.

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.पाथरी जि.परभणी
23/5/2026

२. दिनांक १६/०३/२०२६ रोजीच्या सभेचे हजेरीपत्रक वारंवार मागणी करूनही आजपर्यंत कोणत्याही सदस्यास देण्यात आलेले नाही. उलट जाणीवपूर्वक माहिती दडवून शासकीय अभिलेखात फेरफार करण्यात आलेला आहे. आरोपी श्री अशोक वाघुंबरे यांनी प्रत्यक्ष सभेमध्ये चर्चा न झालेल्या “जुना आठवडी बाजार” या विषयाचा खोटा ठराव तयार करून तो मिनिट बुकमध्ये नोंदविला आहे. सदर कृत्य हे शासकीय अभिलेखात खोटी नोंद करून बनावट दस्तऐवज तयार करण्यास समकक्ष आहे.

३. दिनांक १०/०४/२०२६ व १३/०४/२०२६ रोजी आरोपी श्री आसेफ खान शेरगुल खान पठाण यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने नगराध्यक्ष म्हणून खोट्या नोटिसा तयार केल्या. त्यानंतर त्याच नोटिसांवर एकाच जावक क्रमांकाचा वापर करून तारखेमध्ये फेरफार करण्यात आला व तथाकथित “सुधारित नोटिसा” मुख्याधिकारी यांच्या नावाने जारी करण्यात आल्या.

४. तत्कालीन मुख्याधिकारी श्री उमेश ढाकणे यांनी दिनांक ११/०५/२०२६ रोजी लेखी पत्राद्वारे स्पष्ट केले आहे की, संबंधित नोटिसांवरील स्वाक्षऱ्या त्यांच्या नसून त्यांनी अशा कोणत्याही प्रकारच्या नोटिसा निर्गमित केलेल्या नाहीत.

५. सदर नोटिसांवर आरोपी श्री सुरेश जोशी यांनी नगराध्यक्ष यांच्याशी संगनमत करून मुख्याधिकारी यांची खोटी सही केलेली आहे. तसेच आवक-जावक विभागामध्ये आरोपी श्रीमती मिना दिगंबर आगळे व श्रीमती इंगळे यांनी एकाच जावक क्रमांकाचा वापर करून खोट्या नोटिसा तयार करून शासकीय नोंदींमध्ये फेरफार केलेला आहे.

६. आरोपी श्री आसेफ खान शेरगुल खान पठाण यांनी नगर परिषदेमधील कर्मचाऱ्यांना हाताशी धरून खोटे व बनावट अभिलेख तयार केले असून मुख्याधिकारी यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करून सार्वजनिक पदाचा स्पष्ट गैरवापर केलेला आहे.

७. यावरून आरोपींनी संगनमताने खोट्या स्वाक्षऱ्या, बनावट कागदपत्रे, खोटी कार्यालयीन नोंदी व जावक क्रमांकाचा गैरवापर करून बनावट शासकीय दस्तऐवज तयार केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे.

८. आरोपींचे कृत्य हे न्यायालय, शासन व नागरिकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने शासकीय नोंदींमध्ये फेरफार करून करण्यात आलेले असून अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत त्यामुळे आरोपींविरुद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद होणे आवश्यक आहे :-

कलम ३३६ – बनावट दस्तऐवज / खोटी कागदपत्रे तयार करणे
कलम ३३८ – बनावट शासकीय अभिलेख तयार करणे
कलम ३४०(२) – बनावट दस्तऐवजाचा वापर खरा म्हणून करणे
कलम ६१(२) – सामूहिक हेतूने / संगनमताने गुन्हा करणे
कलम ६२ – गुन्हेगारी कट (Criminal Conspiracy)
कलम २२१ – सार्वजनिक सेवकाने कायद्याचे उल्लंघन करून चुकीची नोंद / आदेश करणे
कलम २३० – सार्वजनिक सेवकाने पदाचा गैरवापर करणे
कलम ३१८(४) – फसवणुकीद्वारे अनुचित लाभ मिळविणे

**विनंती** :-

उपलब्ध कागदपत्रे, नोटिसा, आवक-जावक नोंदी, मिनिट बुक, हजेरी रजिस्टर व संबंधित अभिलेखांची सखोल चौकशी करून वरील आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत योग्य ती फौजदारी कारवाई करून तात्काळ गुन्हा नोंद करण्यात यावा ही नम्र विनंती.

**सोबत** :-

१. संबंधित नोटिसांच्या प्रती
२. तत्कालीन मुख्याधिकारी यांचे पत्र
३. मागणी अर्ज प्रती
४. ठराव प्रत व इतर कागदपत्रे

आपला विश्वासू,

**अब्दुल्ला खान लतीफ खान दुर्रानी**
स्वीकृत सदस्य,
नगर परिषद पाथरी, जि. परभणी

प्रतिलिपी :-

१. मा. पोलीस अधीक्षक, परभणी – माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.
२. मा. पोलीस उपअधीक्षक, सेलू – माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.